

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १८५०
क्र १८६०

१८६०
काव्य

# पल्लविली

REFBK-0011257
REFBK-0011257

सौ. विमल काळे

# प ल्ल वि नी

२५७९३८ काव्य
१८७० २७१५।५०

सौ. विमल काळे

बी. ए.

REFBK-0011257
REFBK-0011257

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २५७९३८ वि. काव्य
क्रमांक १८७० नों. दि. २७१५।५०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११२५८
ग्रंथ ... (स्थळ प्रत)

किंमत दीड रुपया

प्रकाशक :
शरच्चंद्र दयार्णव कोपर्डेकर,
१२५७ सदाशिव पेठ, पुणें २.

प्रथमावृत्ति : १९६०
© सौ. विमल काळे

मुद्रक :
ह. म. गद्रे,
जनवाणी प्रिंटिंग प्रेस,
४५ बुधवार पेठ, पुणें २.

# निवेदन

‘ पल्लविनी ’ हा माझा पहिला काव्यसंग्रह मराठी रसिकांना सादर करतांना मला आनंद होत आहें.

माझे वडील कवि काव्यविहारी यांच्या घरांत माझ्या जन्मापूर्वींच कवितेचा जन्म झाला असल्यामुळें काव्यमय वातावरणाचा लाभ मला माझ्या सुदैवानें अगदीं लहानपणापासून मिळाला. आमच्या घरांत नेहमींच महाराष्ट्रांतील लहानमोठ्या साहित्यिकांची ये-जा असल्यामुळें मराठी साहित्याबद्दल, विशेषतः काव्याबद्दल मला गोडी वाटूं लागली.

माझ्या वडिलांनीं मला काव्यलेखनाची प्रेरणा दिली. त्यांचें मार्गदर्शन मला सुरवातीपासून आजपर्यंत लाभत आलेलें आहे. त्यांचे बंधुतुल्य स्नेही बेळगांवचे डॉ. के. वा. साठे, तसेंच सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. वि. स. खांडेकर व इंदिरा संत ह्यांचें अमोल मार्गदर्शन मला काव्यलेखनाच्या बाबतींत प्रेरक ठरलें आहे. त्यांचा ‘ आशीर्वाद ’ बरोबर घेऊनच मी काव्यप्रांतांत पाऊल टाकतें आहें. श्री भाऊसाहेब खांडेकर ह्यांचे आभार मी कोणत्या शब्दांत मानूं? त्यांच्या ऋणांत राहण्यांतच आनंद आहे. महाराष्ट्राच्या प्रथितयश कवयित्री सौ. संजीवनी मराठे यांच्याशीं झालेली काव्यचर्चा माझ्या काव्यलेखनाला अत्यंत उपकारक ठरली आहे.

माझी पहिलीच कविता १९४७ सालीं ‘ स्त्री ’ मासिकांत छापून आली. तेव्हांपासून ‘ किर्लोस्कर ’ मासिकांचे संपादक श्री. शं. वा. किर्लोस्कर व नंतर श्री. मुकुंदराव किर्लोस्कर यांचें सक्रिय प्रोत्साहन माझ्या काव्य-लेखनाला लाभलें आहे. त्यांची मी आभारी आहें.

माझा काव्यसंग्रह काढण्याची भाषा सुरू होतांच आमचे स्नेही व माझ्या नाटिकांचे प्रकाशक श्री. द. र. कोपर्डेकर व त्यांचे सुविद्य चिरंजीव श्री. हेमचंद्र B. E. व श्री. शरच्चंद्र ह्यांनीं अत्यंत आपलेपणानें पुस्तकाची जबाबदारी आपल्या अंगावर घेण्याचें आश्वासन दिलें व पारहि पाडलें. त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच. संतवाङ्मयाचे एक चिकित्सक अभ्यासक श्री. रा. चिं. ढेरे ह्यांनीं या संग्रहाच्या प्रकाशनाबाबत संग्रहाला नांव सुचविण्यापासून सर्व तऱ्हेचें सहाय्य केलें. त्यांच्या सौहार्दाबद्दल मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहें.

मिरज,<br>
गुरुपौर्णिमा, ८ जुलै १९६०

**सौ. विमल काळे**

# आशीर्वाद

सौ. विमल काळे हिला ती लहान असल्यापासून मी ओळखीत आहें. १९४० सालीं जमखिंडी येथें भरलेल्या द. महाराष्ट्र साहित्य संमेलनांत तिनें—त्या वेळीं ती कु. विमल गद्रे होती—गोड गळ्यानें आपल्या वडिलांची कविता म्हटली होती. वीस वर्षांच्या चाळणींतून गळतां गळतां त्या संमेलनाच्या ज्या आठवणी माझ्यापाशीं उरल्या आहेत, त्यांत विमलच्या काव्यगायनाची स्मृति आहे.

पित्याचा वारसा पुत्रानें चालविला, असें कला किंवा साहित्य या क्षेत्रांत क्वचितच घडतें. मुलीनें तो चालविल्याचीं उदाहरणें तर याहूनहि विरळा आहेत. म्हणून सौ. विमल काळे हिचें तिच्या काव्यलेखनाबद्दल कौतुक करावेंसें वाटतें. गोविंदाग्रज व बालकवि यांचा अस्त आणि रविकिरण-मंडळाचा उदय यांच्यामधला संधिकाल ज्या कवींनीं सुना वाटूं दिला नाहीं, त्यांत विमलचे वडील काव्यविहारी यांची गणना होते.

सौ. विमलच्या काव्यांतला मोठा गुण म्हणजे प्रसाद. बालपणीं पित्यापाशीं श्रीगणेशा गिरवितांनाच त्यांच्या कल्पनांतील प्रसाद तिनें आत्मसात् केला आहे कीं काय कुणास ठाऊक ! काव्यविहारींच्या काव्यांतलें ओज तिच्या रचनेंत नाहीं. पण माधुर्य त्यांच्या कवितेपेक्षां अधिक आहे. बुधगांव, हरिपूर, सांगली, तासगांव, मिरज या गांवांत ही कवयित्री लहानाची मोठी झाली. तिची कविता द. महाराष्ट्राच्या या परिसरांतच फुलली. तिच्या मनानें कोमल अनुभूतींचे जे कांहीं कण नीटसपणें टिपून घेतले, ते याच पंचक्रोशींतील जीवनांतून. त्यामुळें तिच्या अनुभूतींना अनेक मर्यादा पडल्या. आनंदाची गोष्ट ही कीं, या मर्यादांची आतां तिलाहि जाणीव झाली आहे.

सौ. विमलच्या कवितांची प्रकृति मूलतः अंतर्मुख नाहीं. जुन्या-नव्या इंग्रजी कवितेशीं संस्काराच्या दृष्टीनें तिचा संबंध आला असावा असें वाटत नाहीं. नदीचें पात्र रुंद आणि खोल व्हावयाला तिचा प्रवाह अनुकूल अशा भूभागांतून वाहत जावा लागतो. विमलच्या कवितेला ही संधि मिळालेली नाहीं. त्यामुळें या संग्रहांतली निम्मीअधिक कविता पद्य आणि काव्य यांच्या सीमारेषेवर उभी आहे, असें अनेकांना वाटेल.

हें सर्व खरें असलें तरी कवियशाची अपेक्षा करणाऱ्या व्यक्तीनें या सर्व गोष्टींची स्वतःच्या मनाशीं कठोरपणें चिकित्सा केली पाहिजे. प्रसंगीं

हातांतील शस्त्र स्वतःवर वापरलें पाहिजे, असें मला वाटतें. सौ. विमल या दृष्टीनें विचार करूं लागली आहे, असें १९५० नंतरच्या तिच्या कांहीं कवितांवरून वाटतें. त्यांत तिच्या कविमनाचा विकास प्रत्ययाला येतो. 'मींच दिली शिकवण' ही तिची १९५६ सालची कविता पहावी. त्यांतील पुढील ओळींवरून आपल्या अनुभूतींना व त्यांच्या आविष्कारांना पडलेलीं बंधनें तिला टोचूं लागली आहेत हें स्पष्ट दिसतें. ती म्हणते :

तुज पाठवावें मना    विहराया स्वच्छंदानें
मज वाटतें नसावीं    तुझ्याभोंवतीं बंधनें
तुझा अनिर्बंध खेळ    धुंद होऊनि पहावा
नको मज दुजें कांहीं    तोच माझा रे विसावा

'ओळ उमटतां', 'एक जलाशय', 'मुक्या कळ्या', 'अशा क्षणीं', 'पहांट आली', 'पाश' या कवितांत ज्या अनुभूतींचा आविष्कार झाला आहे त्या निःसंशय कवयित्रीची प्रगति दर्शवितात. आपलें खरें बळ अशा कवितांत आहे, हें ओळखून विमलनें आपला पुढला काव्यप्रवास सुरू करावा, असें माझें तिला आग्रहाचें सांगणें आहे. अनेकांना प्रसन्न व प्रवाही रचना सुसाध्य नसते. पण या कवयित्रीला या बाबतींत वरदान लाभलें आहे. पण प्रसाद सूचकतेनें अधिक खुलतो, ही गोष्ट तिनें विसरूं नये. 'मुक्या कळ्या' ही तिची कविता हें या प्रकारचें चांगलें उदाहरण आहे. 'पाश'सारख्या कवितांना लागणारी अनुभवांची शिदोरी आतां तिला दुर्लभ नाहीं. किंचित् अंतर्मुख होऊन समर्थपणें ती असले विषय हाताळूं लागली तर आपल्या सानुल्या प्रतिभेनें शारदेचीं पावलें भूषवावींत अशी जी तिची इच्छा आहे, ती सहज सफल होईल.

कोल्हापूर,
२४।६।१९६०

वि. स. खांडेकर

# प्रस्तावना

सौ. विमलाबाई या सुप्रसिद्ध कवि काव्यविहारी यांच्या कन्या. लहानपणापासूनच विमलाबाई काव्यात्म वातावरणांत वाढल्या. वडिलांच्या कविता वाचणें, ऐकणें, त्यांच्या काव्याच्या ओळी मनांत घोळवणें, याबरोबरच त्या वेळच्या रविकिरणमंडळाच्या कवींच्या काव्याचा आस्वाद घेणें, या गोष्टींचा लाभ त्यांना लहानपणापासूनच झाला. घरचें वातावरणच असें काव्यानुकूल असल्यानें या कवयित्रीला काव्याची गोडी लहानपणापासूनच लागल्यास नवल नाहीं.

वडिलांच्या कविता ऐकत असतांनाच विमलाबाईंनीं काव्यरचनेचे धडे घेतले, शब्दांची मांडणी समजून घेतली भाषेवरील प्रभुत्व मिळविलें आणि आपल्या काव्यशक्तीचा विश्वास वाटूं लागल्यावर कविता लिहिली. कांहीं कविता लिहून त्या थांबल्या नाहींत; तर निष्ठेनें लिहूं लागल्या. आज प्रसिद्ध होणारी 'पल्लविनी' हें या निष्ठेचेंच प्रतीक आहे. या 'पल्लविनी'-वरून नजर फिरवली कीं ज्या गोष्टी प्रकर्षानें जाणवतात त्या ह्या.

विमलाबाईंची प्रतिभा केवळ अनुभवांचें बाह्यदर्शन टिपूं शकते; अनुभवाची खोली व विस्तार आणि अनुभवाचें अंतर्बिंब याची जाणीव तिला झालेली नाहीं; अनुभवाची सूक्ष्मता टिपण्याइतकी ती अजून कुशल व्हायची आहे. त्यांची काव्यशक्ति जोपासली जात असतांना, तिला जें खत-पाणी मिळालें, तिचा हा परिणाम असावा.

'मुक्या कळ्या', 'रोज नव्या प्रकाशानें', 'पाश' अशा सुंदर भावकविता लिहिणारी कवयित्री जेव्हां औपचारिक प्रासंगिक विषयांत रमतांना आढळते, तेव्हां वरील विधानाची सत्यता पटल्याशिवाय रहात नाहीं. 'जा परतुनी', 'स्नेहसंजीवनीस', 'शेजीबाई' इत्यादींसारख्या ढोबळ काव्यविषयाच्या कविता, त्यामुळें, संग्रहांत अधिक आढळतात. सर्वसाधारण विचारांचें पद्यांत किंवा वृत्तांत रूपांतर म्हणजे कविता नव्हे, ही जाणीव अजून विमलाबाईंना यायची आहे. भाववृत्तींचा शोध घेण्याची तपश्चर्याहि अजून त्यांना साधायला हवी आहे.

भाववृत्तीचा शोध घेण्याची जाणीव नसल्यानें त्यांच्या कांहीं कविता फिक्या उतरल्या आहेत. ‘ ओळ उमटतां ’, ‘ नको विचारूं ’, ‘ नजर तिथेची ’ या त्या कविता. कांहींतरी काव्यशक्तीला जाणवलें आहे, पण तें साकार करण्याचा छंद जडलेला नाहीं...जसें येईल तसें मांडण्यांत समाधान मानलेलें दिसून येत आहे.

भावकविता लिहिणारी ही कवयित्री मधूनमधून गीतेंहि लिहिते. ‘ गायिकेस ’, ‘ गोकुळ जणुं भारलें ’, ‘ रंसिका ”, ‘ चंद्रकोर ’ हीं कांहीं भावगीतांचीं उदाहरणें. भावगीतांत आणि भावकवितेंत मूलभूतच फरक असल्यानें भावकविता लिहिणारानें गीतांच्या नादीं लागूं नये, असें मला वाटतें.

हें सर्व कवितेच्या आशयासंबंधीं आणि रचनेसंबंधीं. पण कवयित्रीनें जें जाणवलें तें मोठ्या नीटनेटकेपणानें आणि संयमानें मांडलें आहे, हें या कवितांचें वैशिष्ट्य आहे. कवयित्री शब्दांच्या भुलावणीला जशी भुलत नाहीं, तशी नव्या नव्या अभिव्यक्तींच्या मोहानें झुलतहि नाहीं. अगदीं साधी, सनसोकळी भाषा लिहिणाऱ्या विमलाबाईंना कविता कुठें संपवावी, हें नेमकें उमगलेलें आहे. ‘ लाभतां प्रेरक जीवनसंदेश ’, ‘ लाभ ’, ‘ कोरें पत्र ’ इत्यादि कविता वरील विधानाची साक्ष पटवतील.

‘ पल्लविनी ’ वाचून संपविली आणि एक कविता मनांत राहून गेली— ‘ रोज नव्या प्रकाशानें ’ मला वाटतें, ही कविताच विमलाबाईंच्या काव्य-शक्तीला मार्गदर्शन करणारी आहे. त्यांच्या काव्यशक्तीचें सामर्थ्य पटविणारी आहे. आणि विमलाबाईंच्या काव्यकर्तृत्वाचें भविष्य वर्तविणारी आहे.

“ रोज नव्या पाकळीनें, फुलूं पाहतें जीवन
सुगंधाच्या जाणिवेनें मोहरतें तन मन ! ”

विमलाबाईंची पुढील विकसित होणारी कविता आणि त्या कविते-संबंधीं रासिकांच्या आकांक्षा....याच जणूं या चार ओळींत व्यक्त झालेल्या आहेत.

बेळगांव,
३–७–६०

**इंदिरा संत**

‘ पल्लविनी ’ म्हणजे वेल-- वसंतागमानें पालवलेली वेल. ‘ पल्लविनी ’ हा शब्द शिवाला जिंकण्यासाठीं निघालेल्या ‘ संचारिणी पल्लविनी लतेव ’ अशा उमेचें स्मरण करून देतो. कवि हा जात्याच ‘ शैव ’ असतो. ‘शिव’-साक्षात्कारासाठींच त्याची ‘ सौंदर्य ’-साधना चालू असते. सौंदर्याच्या मोहिनीनें ‘ शिवा ’ला-जिंकण्याचें त्याचें स्वप्न असतें. अर्थात् ही कवीची ‘उमा’ जेव्हां बाह्य सौंदर्याचा मोह आवरून अंतर्मुख बनते आणि तपस्विनी होऊन ‘ शिवाराधना ’ करूं लागते, तेव्हां तिच्या गात्रागात्रांतून तिच्या आत्म्याचें तेज झळाळूं लागतें. सौ. विमल काळे या रूपगर्विता उमेकडून तपस्विनी उमेकडे झुकूं लागल्या आहेत, असें त्यांच्या कवितांवरून सहज प्रतीत होतें.

* * *

# रसिका

बहरास वेल आली सुमनें कितीक फुलती
मी सिद्ध आज रसिका, अर्पावया तुला तीं

एकेक फूल फुलतां मी मोहरून गेलें .
हरपून भान अवघें नादांत गुंग झालें

संकोच मजसि वाटे संभार दावितांना
उठतात भावनांच्या लहरी मनांत नाना

लतिकेवरी फुलावीं फिरुनी फुलें टपोरीं
तोडूनि घेतलीं मीं सुमनें करांत सारीं

म्हणुनी तुला विनंती घे पारखून हातीं
मी सिद्ध आज रसिका अर्पावया तुला तीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २८९३५ वि: काव्य
क्रमांक ९८८० नों: दि: २८।५।६०

मिरज,
२७-२-६०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११२५७

# गायिकेस

गा असाचि दिव्य राग सतत गायनीं

हृद्-वीणा तव छेडुनि
मधुर स्वरें भर अवनी
जाऊं दे जग गुंगुनि
टाक गडे सकलांवरि गोड मोहिनी

मृत जगता दे जीवन
दुष्ट जनां करि पावन
ऐकुनि तव ऐक्यगान
जाऊं दे विश्व सकल स्वार्थ विसरुनी

कंटकमय या जगतीं
दीन पतित किति रडती
नाहिं कुणा तिळ शांती
करि सांत्वन सकलांचें गीत गाउनी

आळव गे राग दीप
पसरि तेज जगिं उमाप
समर-काल ये समीप
चेतवुनी टाक जगा स्फूर्ति देउनी

बुधगांव,
१०-१-४७

# गूढ

गूढ मनांतिल माझ्या, बाळे
उकलणार तूं केव्हां न कळे !
जन्मापासुनि तुझ्या कोमले,
गूढ मनाला माझ्या पडलें
गोजिरवाणा देह सानुला
नकळत माझ्या कसा वाढला ?
कुणीं शिकविलें हंसावया तुज–
करावया मजसंगें हितगुज ?
निर्मल हास्यामुळेंच तुझिया
क्लेश हृदयींचे जाती विलया
हंसतां हंसतां ओठ काढुनी
क्षणिं करिसी आकांत रडूनी !
ऊन–पावसाची ही लीला
कुणीं शिकविली बाले तुजला ?
तव हास्यानें मीही हंसतें
तव रडण्यानें व्याकुळ होतें !
तुझ्या मनांतिल तरंग सुंदर
कोण उठवितें मम हृदयावर ?
सृष्टीचें भांडार अलौकिक
तयांत गूढें असति अमोलिक !
एक गूढ त्या भांडारांतिल
गूढ कसें मम तूं उलगडशिल ?

सांगली,
१९–७–५१

# स्नेह-संजीवनीस

तुझ्या नि माझ्या मैत्रीचा हा
सुयोग सहजीं जमुनी आला
गोड मनीषा किती दिसांची
आली सखये आज फळाला

नवीन रुजला अपुल्या हृदयीं
कोमल सुंदर हा स्नेहांकुर
घालुनिया जल सद्भावांचें
वाढविण्या मी अतीव आतुर

भेट आपुली होउनि जातां
तरल धुंदशा वातावरणीं
झोके घेतें आणि नाचतें-
मानस माझें मुदित होउनी

कधीं वाटतें गाणीं गावीं
आणि रचावी सुंदर कविता
कलामयी तूं! तव सहवासीं
रमुनी जावें विसरुनि जगता

आठवतां तव सुस्वर गायन
आनंदुनि मम जाई कण कण
गृह-कर्तव्यें मदीय सारीं
त्या नादांतचि करितें गुंगुन

दूर ठेवुंया स्नेह आपुला
सखि ! बाजारी जगतापासुन
सतत देत जा मला दिलासा
दे स्नेहाचें मधु संजीवन

सांगली,
२७-६-५२

# शेजीबाई

येतां दारीं तुझ्या शेजी
बोल तुझे कानीं आले
भावपुष्प नकळत माझें
तुवां चुरूनी टाकिलें

नको शेजी म्हणूं माझ्या
पायगुणाचा गे दोष
याच पायासवें आली
भाग्यदेवता घरास

नको शेजी म्हणूं माझी
दृष्ट लागेल बाळांना
ह्याच स्निग्ध नजरेनें
वाढवितें पांखरांना

नको शेजी म्हणूं माझें
मन गेलें कशावर
तृप्तिसागरांत माझें
आज पोहतें अंतर

नको नको शेजी असे
बोल बोलूस कोणाला
शब्द जाती वाऱ्यासवें
बोच राही हृदयाला

सां ग ली,
१७-१०-५२

# मी मुक्त मनानें

डोळांत भरारी घेई तूं अस्मानीं
सानंद कौतुकें बघेन मी येथोनी   धृ०

कधिं कधिं वाटतें विहरावें तुजसंगें
परि पाश घराचे ओढिति मजला मागें
देईन स्फूर्ति तुज इथेंच मी राहूनी

कर धरुनि चाललों मिळुनि पाउलें सात
परि कशी येउं मी तव मागोवा घेत
जा एकलाच तूं कर माझा सोडूनी

जा खुशाल, परि तूं ठेव भूवरी नजर
करणार नाहिं मी मुळीं कशाची कदर
देईल धीर मज नजर तुझी तेथूनी

जा खुशाल, तुजला अडविणार मी नाहीं
तूं स्वतंत्र; माझा जीव गुंतला गेहीं
मानीन सौख्य मी स्वतंत्रता तव बघुनी

मज ठाउक, नाहीं साम्य तुझ्या-माझ्यांत
जग हेंच तुझें घर; जग माझें घरट्यांत
मी मुक्त मनानें सतत बंधनीं असुनी

सांगली,
१५-१२-५२

# मानस माझें

धूसर काळें ढगाळलें नभ
थेंब एकही परी पडेना
आड लपविल्या रविरायाची
किरण-शलाका मजसि दिसेना

थिजला वारा, न करी हितगुज
स्तब्ध जाहलीं झाडें, वेली
झोला नाहीं खेळायाला
म्हणुनी सुमनें रुसुनी बसलीं

मुके बैसले पक्षि कोटरीं
मौन तयांचें मला न साहत
काय चेतनारूप अहल्या
शिळा जाहली होउनि शापित ?

दोन मनांमधिं दूरत्वाचें
कमल-पत्र जणुं अवाचित आलें
सभोंवतींची पाहुन जडता
मानस माझें व्याकुळ झालें

सांगली,
१५-८-५३

# प्रतिभे सानुले

किती समजावूं तुज
माझ्या प्रतिभे सानुले !
इतुक्यांत नको झेप
पंख तुझे इवलाले

बाले! गरुड-भरारी
तुज नाहीं झेपणारी
नको पाहूं अंतराळीं
बघ आधीं घरीं, दारीं

नदी, पर्वत, सागर
पाहसी तूं कौतुकानें
सांगावया मौज परी
शब्द तुझ्यापाशीं उणे !

गोड गान ऐकुनिया
हरपतें तुझें भान
देखतांचि चंद्र, तारे
होतें वेडें तुझें मन!

दाटुनिया उचंबळे
तुझ्या मनीं हुरहुर
तिला द्याया शब्दरूप
नको होऊंस अधीर

नको होऊं उतावीळ
नको तळमळूं मनीं
तपोबळें मिळे स्थान
शारदेच्या आभूषणीं

आभूषणीं जरी स्थान
नाहीं तुजला मिळालें
भूषवावीं आनंदानें
शारदेचीं तूं पाउलें

सांगली,
८-८-५२

# तिलोत्तमा

स्नेहमयी मैत्रिणी माझिया
जणूं मनोहर गेंद फुलांचा
आपआपुल्यापरी सुवासिक
प्रिय मजला सहवास तयांचा

कोणी करुणा, निष्ठा कोणी
कुणी गभीरा, धैर्यशालिनी
कुणी सुशांता, कुणी कोमला
कुणि सुहासिनी मनोहारिणी

मूर्तिमंत जणु कुणी रसिकता
कुणी निरागस बालकापरी
वैभव सत्ता करी कुणाच्या
गोड जिव्हाळा आणि अंतरीं

जें जें नाहीं जवळी माझ्या
सख्यांजवळ मी तेंच शोधितें
स्नेहल सहवासांत तयांच्या
मानस-कलिका फुलू पाहते

टिपुनी सद्‌गुण मगीं कल्पितें
तिलोत्तमेची सुंदर मूर्ती
सान्निध्यानें तिचिया लाभे
पूर्णत्वाची मनास शांती

सांगली,
५-७-५३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 25934 वि: काव्य
क्रमांक 98100 नों: दि: 25/5/60

# गोकुळ जणुं भारलें

मधुर गीत ये श्रवणीं देहभान हरपलें धृ०
सुमनगंध मिसळुनी
चांदण्यांत माखुनी
स्वर्गांतुनि अमृत जणुं मजवरि कुणि सिंचिलें

फेकुनि मधु स्वरमाया
मोहवीत जीवा या
नादब्रह्म मजभवतीं नकळत कुणि पसरिलें ?

चित्तवृत्ति मोहरल्या
गानामधिं त्या विरल्या
अननुभूत आनंदें मानस मम रंगलें

मंत्र-मुग्ध चांदरात
धुंद शांत आसमंत
ऐकुनि मधु मुरलिनाद गोकुळ जणुं भारलें

सांगली,
२०-३-५४

# ध्वजा दिव्य ती

पहाटसमयीं आला श्रवणीं
मधुर पूरिया वांग्यावरुनी
किलबिलणाऱ्या पांखरांसवें
निद्रा माझी गेली उडुनी

उठुनी गेलें पहावयाला
स्वातंत्र्यांतिल पहिला शुभदिन
फडफडणाऱ्या राष्ट्रध्वजानें
दिधलें मजला पवित्र दर्शन

राष्ट्राची मूर्तिमंत इभ्रत
समोर माझ्या उभी बघूनी
सद्‌भावानें मानवंदना
दिली तियेला कर जोडूनी

तोंच जाहलें स्तिमित पाहुनी
राष्ट्रध्वज नव विशाल सुंदर
डुलता कळसावर धरतीच्या
गाजवीत सत्ता जगतावर

अरुणाचा रक्तिमा मनोहर
जवळ पांढरें पटल ढगाचें
चक्र निळें शोभतें मधोमध
विरल ढगांतुन नील नभाचें

हरित छटा ही आली कुठुनी ?
ही तर सृष्टीच्या साजाची !
करण्या स्वागत भाग्यदिनाचें
ल्याली हिरवें वसन, तयाची !

उभी राहिलें क्षणभर निश्चल
सहज लवविलें मस्तक खालीं
इवल्या माझ्या हृदयसंपुटीं
ध्वजा दिव्य ती भरुनि ठेविली

सांगली,
१५-८-५३

# ओल उमटतां

सांद्र घनासम भारावें मन
उदासवाण्या क्षणाक्षणांनीं
गुदमरूनि मग जीव जातसे
कोंदटलेल्या वातावरणीं

मेघामधुनी ठिबके पाणी
होइ मोकळें क्षणांत अंतर
दमट मनाच्या परि नयनांना
कसा फुटेना लवही पाझर

मेघसमूहा नेई वारा
खुलवित खुलवित दूर वाहुनि
गारठलेलें मानस परि मम
मुळीं हलेना, बसलें थिजुनी

सांद्र घनांतिल परि बिजलीसम
ओल उमटतां मधु काव्याची
गेली निघुनी दूर कुठेंतरि
जडता माझ्या सांद्र मनाची

सांगली,
१५-८-५३

# नको विचारूं

" चूक कुणाची ? " नको विचारूं
तुझी कधींतरि मम नित्याची
आशय असुनी मनीं चांगला
नकळत घडते कृती चुकीची

नको विचारूं, " असें कसें हें ? "
असेंच नकळत घडावयाचें !
बागडतें वासरूं मनाचें
उगिच कशाला अडवायाचें ?

अडकवुनी शिस्तीचें दावें
नको तयावर घालूं बंधन
सौख्याचा मम अमोल ठेवा
नकोस घेऊं असा हिरावुन

झुळझुळणाऱ्या निर्झरापरी
जीवन अपुलें अतीव निर्मल
नकळत घालुनि बांध आडवा
नको करूं तें उगाच अविचल

वेलीवरल्या दंवबिंदूसम
कण सौख्याचे चमचम करिती
नकळत देऊं नको हादरा
निखळतील ते सुंदर मोती

सांगली,
२८-९-५३

# आलें दूर

आलें दूर दूर किती
तुझ्या ममतेपासून
धांव घेतें माझें मन
तुझ्याकडे

तुझी येतां आठवण
येतो मायेचा सुगंध
गोड स्मृती अनिर्बंध
उसळती

आठवते घडीं घडीं
गीत मोटेचें सुरेल
दुभत्याची रेलचेल
तुझ्या घरीं

ओल्या पिकांचा सुवास
तरळतो माझ्या मनीं
कपिलेची हांक कानीं
ऐकूं येते

माहेरच्या मेळाव्यांत
दिस चार घालवावे
प्रेम अवीट चाखावें
वाटे मज

अशा किती आठवणी
मज करितां बेचैन
उतावीळ होई मन
भेटीसाठीं

पांखरांच्या थव्यासवें
यावें वाटतें उडून
घांस प्रेमाचा खाऊन
परतावें

सांगली,
२५-३-५४

# चंद्रकोर मी

चंद्रकोर मी आज बिजेची क्षितिजीं डोकावुनि बघते

तव तेजाचा अंश चिमुकला
घेउनिया मीं देह सजविला
दिव्य प्रेरणा तुझी घेउनी ओलांडिन मी गगनातें

वाढत जाऊन कलेकलेनें
रजतकणांच्या वर्षावानें
वसुंधरेला टाकिन उजळुन, स्वप्न उद्यांचें मी बघतें

द्याया श्रांत मना संजीवन
घडविन सौंदर्याचें दर्शन
चंड तेज तव करूनि शीतल सुखवीन सवध्या जगतातें

परी रम्यता मम रविराया
तुझीच रे ही सारी किमया
कृतज्ञतेची वाहुन अंजलि व्योम-मार्ग मी आक्रमितें

सांगली,
३१ - ३ - ५४

# एक जलाशय

एक जलाशय गहिरा निळसर
चिमुकलाच पण नयनमनोहर
तृणपात्यांनीं अंकुरलेलें
रानफुलांनीं गजबजलेलें
विश्व तयाचें प्रशांत इवलें
होतें हृदयीं बिंबित झालें
जणुं लाटांच्या नौकांमधुनी
प्रतिबिंबें तीं बसलीं जपुनी
प्रकाशकिरणीं चमके सुंदर
एक जलाशय गहिरा निळसर !

तोंच जलामधिं पडूं लागले
चहुबाजूंनीं दगड थोरले
जलाशयाची प्रसन्न स्थिरता
भंग पावली बघतां बघतां
घाणउसळुनी वरती आली
प्रतिबिंबें त्या क्षणीं निमालीं

झटकन् विरल्या हंसऱ्या लहरी
दूर पळालीं फुलें गोजिरीं
क्षणांत झाला गढूळ अस्थिर
तोच जलाशय गहिरा निळसर

आधारच जो जलाशयाचा
कुणास ठावा भाग तळाचा !
रविकिरणांचें तया न दर्शन
चैतन्याचें कधीं न स्पंदन
अचेतनाचें जगतों जीवन
सौंदर्याचें केवळ साधन
कधिं न मिळाली परी तयाला
शोभा वरची पहावयाला
आस आपुली पुरवायाला
असेल का तो वरती आला ?
होऊं दे मग क्षणभर धूसर
शांत जलाशय गहिरा निळसर !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 97256

सांगली,
१९-८-५४

# भावविश्वांत माझिया

भावविश्व माझें मज
जणूं खजिना स्वप्नांचा
ओलसर अंगणांत
सडा पारिजातकाचा

भावविश्वांत माझिया
अनुभूति बेहोशीची
आणि धुंद खुलावट
मुग्ध राग-रागिण्यांची

भावविश्वांत माझिया
अमूर्ताचें मूर्त रूप
निराशेच्या अंधारांत
तारकांचे लाख दीप

भावविश्वांत माझिया
नाहीं उजाड एकान्त
किलबिल पांखरांची
मज करितें सोबत

भावविश्वांत माझिया
नाहीं अतृप्तीची आग
मृदु कोषांत रेशमी
विसावलें अंतरंग

सांगली,
१९-८-५४.

# रोज नव्या प्रकाशानें

रोज नव्या प्रकाशानें
सूर्य उजळितो घर
हळु अंतरीं शिरती
त्याचे चैतन्याचे कर

नव्या उत्साहानें येई
मंद वाऱ्याची झुळूक
तिचा शीतल दिलासा
होई मनाला प्रेरक

रोज नवी नवलाई
उभी माझिया दारांत
आनंदानें उमेदीनें
तिचे करितें स्वागत

रोज नव्या पाकळीनें
फुलू पहातें जीवन
सुगंधाच्या जाणिवेनें
मोहरतें तन-मन

सांगली,
१९-८-५४

# सजल घनासम

[ माझे वडील कवि काव्यविहारी यांच्या षष्ट्यब्द-पूर्तीनिमित्त झालेल्या सत्कार-समारंभ-प्रसंगीं लिहिलेली कविता. ]

सजल घनासम वत्सल होउनि
        आपण आम्हां जीवन दिधलें

संतोषानें भरलेलें घर
सद्‌भावांचा वास निरंतर
उभयांनीं त्या कलात्म गेहीं
        असुचें जीवन-सुमन फुलविलें

तुम्हीं शिकविलें नभिं विहराया
जगताचें सौंदर्य पहाया
बाल्यापासुनि निर्भयतेचें
        बीज आमुच्या मनीं रुजविलें

स्वाभिमानयुत निःस्पृहतेची
शिकवण दिधली मानव्याची
वाट दावुनी कर्तव्याची
        मानस असुचें सतत घडविलें

सहवासाची शीतल छाया
सदैव लाभो अपुली माया
हेंच मागणें अम्ही मागतों
        कला-गुणांचे वारस अपुले

सांगली,
१४-११-५४

## मंद दरवळ

श्रमल्या जीवाला
मिळावी दिनांतीं
मऊशी, उबेची
निद्रेची दुलई !

श्रमपरिहार
कराया लाभावा
प्रेमाचा अमोल
एकच शब्द !

दिवसभराच्या
भल्या आणि बुऱ्या
कृत्यांची असावी
जिवाला दखल !

जीवनमार्गात
प्रकाश देणारें
साहित्य अजोड
असावें हातांत !

मानवतेच्या अन्
सुखद स्पर्शाचा
मंद दरवळ
असावा मनांत

सांगली,
२०-११-५४

# जा परतुनि

[ दीर्घकालीन आजारामुळें विषण्ण झालेल्या मनाचे बोल ]

जा परतुनि कलिकाला ! शिणलि न ही काया
इतुक्यांतचि मजसमीप येउं नको सदया !
आप्त-मित्र भवतींचे प्रेम-सुधा जे वर्षति
सोडुनि त्या सकलां, कां येऊं तुज सांगातीं ?

क्रमितों हा जीवन-पथ एकमेक हात धरुनि
दुखवुं काय सहचरास एकलाच सोडूनी ?
वंश-वेल मम सुकेल स्नेहजलाविन सदया !
येऊं का सारे हे स्नेहबंध तोडुनिया ?

कर्तव्यापासुनि मज माघार न घ्यायाची
फुलविन देशासाठीं सुमनें मम जीवाचीं
कार्यमग्न राहूं दे सत्कारणीं काया
इतुक्यांतचि मजसमीप येउं नको सदया !

*　　　*　　　*

करिन कार्य जीवनभर सोपविलें जें मजवर
श्रांत जिवावरति घाल मायेची मग पांखर !

सांगली,
१९-८-५१

# टिपूर चांदणें

प्रफुल्ल ज्योत्स्ना माघामधली
रजतरसानें रजनी न्हाली
पवनाच्या मृदु लहरीसंगें
मधुमासाची चाहुल आली

शिशिराचीं परतलीं पाउलें
ऋतुराजाचे दूत पातले
वठली काया वृक्ष-लतांची
रोमांचांनीं नटली खुलली

निशिगंधानें खेळ मांडला
रातराणिची साथ तयाला
त्यास खुणेची शीळ घालुनी
आम्रमंजिरी हळूंच हंसली

आपआपुले गंध उधळुनी
खेळ खेळती सारी जमुनी
धुंद गंध अन् धुंद चांदणें
कशी कळेना रात संपली

सांगली ;
१८-१२-५४

# हवेंसें वाटतें

हवेंसें वाटतें
दुसरें कांहीं ! दुसरें कांहीं !

भूक अन् विश्रांती
एक विवंचना सदाची जिवाला !
नसते कोणाला ?
पशुपक्ष्याला, जीव-जंतुला !
असावा कां हाच एकच ध्यास
माझ्याहि मनाला ?

सुखाची लालसा, विकारांची तृप्ती
सूडाचा आनंद, झुंज अन् चढाई
किडा-मुंगीचीहि ह्यांत चतुराई !
असावें कां हेंच
माझेंहि जीवन-सर्वस्व !

माझी माणसाची जात वेगळी !
माझें माणसाचें ध्येय वेगळें !
झिजलेल्या चंदनाचा
झिरपतो ज्यांतून मंद सुवास
फिकी वाटते ज्याच्यासमोर
असंख्य ज्योतींची सुवर्ण-कांती
नाद चैतन्याचा उठतो ज्यांतून
असेंच कांहींसें अबोध अस्पष्ट
मजला दिसतें !

साक्षात्कारासाठीं अमूर्ताभोंवतीं
मन घोटाळतें
असेंच कांहींसें हवेंसें वाटतें !

सांगली,
११-८-५५

# कल्पनेंत मी केवळ न्हालें

प्रत्यक्षाचा ठेवा दूरच
कल्पनेंत मी केवळ न्हालें
स्पर्श क्षणाचा नव्हता झाला
भासांतचि मी गुंगुनि गेलें

फूल सुवासिक दूर कुठेंतरि
गंधानें मी मोहित झालें
ढगाआडच्या चंद्रकरांचें
चकोर होउनि अमृत प्यालें

चाहुल येतां बरसातीची
मजसि लाभलें नवसंजीवन
झोंपेवांचुनि मुदें ऐकिलें
सुखस्वप्नांचें मधुतर गुंजन

सांगली,
१५-६-५५

# वाटलें

: १ :

झिरझिरित धुक्याच्या तलम पातळावरती
जणुं ल्याली होती हिरवी चोळी धरती
ती गर्भरेशमी तिची कंचुकी बघुनी
वाटलें, दंवाची दिसेल माला खुलुनी !

: २ :

नभिं शशांक आला क्षितिजा ओलांडूनी
तों तया वेढिलें पांढुरक्या मेघांनीं
चुकवुनी तयांना चंद्र निघे वेगांत
वाटलें, चालली लपाछपी गगनांत !

: ३ :

विखरुनी नभांगणि सुमनें अगणित पडलीं
तीं चोरुन न्याया उषासुंदरी टपली
तो स्तब्ध मधोमध मेघखंड पाहूनी
वाटलें, ठेविलें बुजग-बाहुलें गगनीं !

सांगली,
११-१०-५५

# अशा क्षणीं

विस्मरणाचा ओढुनि बुरखा
जगतापासुनि दूर सरावें
जातां जातां बकुलफुलांसम
अबोल निर्मल क्षण वेंचावे

अशा क्षणीं मज नको वाटतो
कडक पहारा स्थलकालाचा
नकोनकोसा आणि वाटतो
अशा क्षणीं सहवास कुणाचा

अशा क्षणीं मज नको वाटतें
माझ्यामधलें कडवट मीपण
नकोच जाणिव नको बंधनें
नको भोंवतीं कसलें कुंपण

अशा क्षणांच्या निर्माल्यांतुन
हळूंच गहिरा वास टिपावा
नीरवतेच्या कुशींत शिरुनी
गूढ अनामिक मोद लुटावा

भारत सेवक समाजाचें
भिलवडी श्रमशिबिर
२८-६-५५

# छटा नवीनच

बासनांतल्या आठवणींच्या
घड्या कधीं कधिं मी उलगडतें
दरवळ पसरे जीर्ण, मिश्र, मधु
किती वेळ तरि हुंगत बसतें

किती शोधिलें नाहीं उमजत
कशाकशाचें मोहक मिश्रण
घड्याघड्यांतुनि घमघमणाऱ्या
छटा पाहुनी जातें गुंगुन

झाडुनि झटकुनि ऊन देउनी
आठवणी त्या जपुन ठेवितें
विस्मरणाच्या कसरीपासुनि
नित्य तयांना दूर राखितें

पुन्हा सोडितें जेव्हां बासन
स्पर्श घड्यांना अलगद करितें
आठवणींतुन दरवळणारी
छटा नवीनच मज जाणवते

... ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थापित.
अनुक्रम २८०१३७ वि: काव्य
क्रमांक १४८० नों. दि: २४।८।८०

सांगली,
१९-११-५५

# पालवी

कधीं कधीं औदासीन्य
येतें शिशिर होऊनी
पानझड नकळतां
सुरू होते त्याच क्षणीं

जाते वठूनी तात्काल
चिमुकली मनोवेल
रूप-रंग-गंधाविना
कसें जीवन साहील ?

होउनिया क्लांतचित्त
दिस बापुडी कंठिते
सभोंवतीं निष्क्रियता
नाच भीषण करिते

कधींतरी अवचित
नवें लेउनिया लेणें
येते प्रतिभा हांसत
गात चैतन्याचें गाणें

आगमनें तिच्या येई
बहरून मधुमास
आणि फुटते पालवी
वठलेल्या लतिकेस

सां ग ली,
१४ - ७ - ५६

# ओघ प्रीतिचा

मंडपांतली सरली धांदल
सूर सनइचे हवेंत विरले
भरलेलें घर सुनें सुनेंसें
विहिणबाइला भासुं लागलें

ठेव जिवाची परक्याहातीं
सोपवितांना करुनि सोहळा
गमलें तिजला जणुं हृदयाचा
लचका कोणीं तोडुनि नेला

दूर निघाली; झाली सरिता
सागरभेटीसाठीं आतुर
साफल्याच्या सौख्यावरती
विरहव्यथेची दाहक फुंकर

" येतें आई, येतें बाबा ! "
क्षण ओठांची झाली थरथर
भरलेल्या डोळ्यांशीं भिडले
गहिंवरलेले शब्द ओलसर

ओघ प्रीतिचा पुढें निघाला
गालावरले आसूं सुकले
नेत्रपल्लवी दुरून होतां
ओठीं नकळत हांसूं फुटलें

सांगली,
१-५-५६

# अशीच ये

सुखद पाउलीं सुखद क्षणीं त्या
पातलीस मम जीवन उजाळित
घनतिमिराचा टाकुनि बुरखा
जेविं उषा ये क्षितिजीं हांसत

दाटुनि आल्या मेघांमधुनी
शशांक यावा नभिं डोकावत
भर मध्यान्हीं कुंद दिशांतुन
झुळूक यावी लहरत लहरत

साखरझोंपेंतुनी प्रभातीं
यावि जागृती नकळत सुखवित
आजवरी सुखविलेस कविते !
अशीच ये मज सदैव रिझवित

सांगली,
२५ - ८ - ५६

# पहांट आली

तलम धुक्याच्या आडोशामधिं
नितळ ओलसर अंग लपेटुनि
प्रसन्नवदना पहांट आली
दंवबिंदूनीं नुकती न्हाउनि

गोकुळांतली गोपी जणुं ही
वस्त्रासाठीं उभी लाजुनी
कदंबवृक्षावरि पूर्वेच्या
कान्हा होता बसला लपुनी

अंगावरती वस्त्र केशरी
खट्याळ कान्हा देई फेकुन
पळुनी गेली तेथुनि मुग्धा
बघत त्याकडे चोरुन चोरुन

सांगली,
२१-११-५५

# नजर तियेची

शिळें आंबलें अन्न एकदां
घेउनि गेलें मी रस्त्यावर
बघत राहिलें इकडे तिकडे
आढळतें कां कुठें जनावर

सुरकुतलेलें एक उपाशी
कुत्रें बघुनी कोनावरती
"चूं चूं" करुनी त्यास खुणावुनि
अन्न ओतिलें दगडावरती

धावणार तें कुत्रें तोंवर
एक भिकारिण-पोर धावली
दगडावरल्या अन्नावरती
आणि तियेनें झडप घातली

अंगावरती जीर्ण लक्तरें
करवंटी अन् झोळी हातीं
तिचिया रूपें पुढें ठाकली
मूर्तिमंत जणुं याचनाच ती

करुण निरागस डोळे मजला
सांगत होते दैन्य आपुलें
पोट रिकामें शिकवित होतें
अन्न खावया शिळें आंबलें

निघुनी गेली, दगडावरलें
खाउनि सारें अन्न भराभर
कृतज्ञतेची नजर तियेची
कांपित गेली माझें अंतर

सांगली,
२५-११-५५

# मींच दिली शिकवण

तरळत्या कल्पनांचे
पदीं बांधून नूपुर
प्रतिभेचा साज तुझ्या
चढवून अंगावर

तुज पाठवावें मना !
विहराया स्वच्छंदानें
मज वाटतें, नसावीं
तुझ्याभोंवतीं बंधनें .

तुझा अनिर्बंध खेळ
धुंद होऊन पहावा
नको मज दुजें कांहीं
तोच माझा रे विसांवा

परी लौकिकाची दोरी
पायीं तुझ्या बांधुनिया
तुझ्या बेभानपणाला
मज लागतें खेचाया

तुला बद्ध पाहतांना
मज क्लेश होती फार
व्यवहारी जग हासे
तुज सोडितांचि स्वैर

जखडुनी तुज, वाटे
थांबवावी ओढाताण
कशी बांधूं बंधमुक्तां ?
मींच दिली शिकवण !

सांगली,
१९-८-५६

# पाश

म्हटलें मीं, " मज घरीं जाउं दे
पाश घराचे ओढिति मजला ! "
तरारलें तव नयनीं पाणी
भाव खेळकर धुवुनी गेला

म्हणालीस तूं, " कधींच नेला
दैवानें मम पाश हिरावुन
ओढ कशाची नाहीं म्हणुनी
थिजुनी बसलें माझें जीवन !

कंठायाचें सदैव मजला
एकाकीपण दारुण खडतर
क्षणिक सुखाची अशीच सोबत
वेंचायाची मज जीवनभर ! "

तोंच कोठुनी तुला पाहुनी
बालशिष्य तव धांवत आले
" बाई ! बाई ! " करीत किलबिल
क्षणांत त्यांनीं तुला वेढिलें

बोललीस तूं त्यांच्यासंगें
पुसुनि आंसवें नयनांमधलीं
आनंदानें हांसत नाचत
दूर पांखरें उडुनि गेलीं

म्हणालीस तूं हंसुनी मजला,
" पाश मोजके तुझिया भवतीं
भाग्यवती मी, पाश चिमकुले
घराघरांतुनि माझे असती ! "

" भाग्यवान परि सखे खरोखर
देश आपुला असे कितितरी
पुसुनी अश्रू, दुसऱ्यांसाठीं
जिथें हांसती तुजसम नारी ! "

सांगली,
६-३-५६

# रात्र संपते

अशी कशी ही रात्र संपते ?
जगतावरची
नीरवतेची
शाल सुकोमल
जातां जातां ओढुनि घेते !
अवकाशाच्या
वृक्षावरला
मोहर सगळा
कणाकणांनीं टिपुनी नेते !
मनामनांतुन
भिरभिरणारीं
स्वप्नपांखरें
क्षणांत एका उडवुनि देते !
विश्वकोटरीं
पंख मिटवुनी
बसला पक्षी
उगिच तयाला ही चाळविते !
जातां जातां
विवंचनेचा
शाप, निर्दया—
रोज तयाला देउनि जाते !

मि र ज,
२५-६-५९

# भास

रात्र नसतां, तारकांगित गगन दिसते लोचनां
दिव्य मोहक भास सुखकर शांतता देई मनां
गुंगुनी मी पाहतें नभ, तारका तों लोपती
हृदयिं दाटुनि राहिलेल्या बालपणच्या त्या स्मृती

दूर असुनी सागराच्या मी जणूं तीरावरीं
खेळत्या लहरी रुपेरी घ्यावया बघतें करीं
तोंच माझ्या दृष्टिपुढुनी स्वप्नलहरी भंगती
हृदयिं दाटुनि राहिलेल्या बालपणच्या त्या स्मृती

असुनि गेहीं मी मनानें हिंडतें रानीं वनीं
चिमुकल्या कलिका सुगंधित आणितें मी वेचुनी
हार गुंफाया बसावें तोंच कलिका पांगती
हृदयिं दाटुनि राहिलेल्या बालपणच्या त्या स्मृती

मिरज,
८-१२-५८

# अमोल दौलत

वावरतांना इकडे तिकडे
घालतेस कां मान खालती
निर्धनता हा नसे गुन्हा, मग
वाटावी कां तुजला खंती !

सळसळणारा स्वाभिमान तूं
टाकतेस कां असा दडपुनी ?
दावितेस कां उगाच जगता
दुबळी लाचारी तूं वदनीं ?

होतें विस्मित तुझी पाहुनी
ओढ अनावर संसाराची
तेज वदनिंचें तुझ्या सांगतें
मजसि कथा तव कर्तृत्वाची

नकोस मानूं स्वतःस निर्धन
तुझें अमोलिक धन सुगुणांचें
तुजपाशीं जें दिसतें मजला
धनिकांजवळ न गवसायाचें

खंत कशाला ? जरि असतीं तव
विदीर्ण वसनें अंगावरचीं
तयाखालती आहे दडली
अमोल दौलत तव हृदयाची

मि र ज,
१ – ७ – ५७

# झुलतें मन

माला दंवबिंदूंची स्पर्शानें ओघळीत
नानाविध पुष्पांतिल मधु-गंधित कण उधळित
जागृतिचें पीस मृदुल वदनावर मम फिरवित
पक्ष्यांच्या बोलींतुन साद हळुंच मज घालित

हंसत हंसत मम स्वप्नीं अवतरली एक परी
कुजबुजली कानांमधिं " दिवस नवा सोनेरी ! "
घोळवीत अंतरांत सुखदायी कुजबुज ती
शोधण्यांत दिवस नवा घालविल्या दिनराती

दैनंदिन कामांतुन आळसल्या घटकांतुन
स्वप्नमयी तीच परी बघते कधिं डोकावुन
सोनेरी स्वप्नाचा मागोवा घेत घेत
धावतसें जीवन हें वाऱ्याच्या वेगें नित

सुखकर त्या शब्दांच्या झोल्यावर झुलतें मन
कुजबुज ती सोनेरी ऐकाया आतुर मन !

मि र ज,
२३ - ९ - ५७

# येई सुवासिनी

[ गोव्याच्या रणरागिणी सौ. सुधाताई जोशी ह्यांनीं घरांत पदार्पण केलें त्या वेळीं त्यांच्या वृद्ध सासूबाईंच्या तोंडून असेच उद्गार निघाले असतील ! ]

येई सुवासिनी घरीं, माप दारीं आनंदाचें
तुझी चाहूल लागतां, राहे भरून केव्हांचें

लाव पाऊल तयाला, मोद येऊं दे घरांत
त्याच्या स्पर्शानें फुलूं दे सुकलेला आसमंत

आज नव्यानें तुझा गे, गृहप्रवेश जाहला
पुन्हा उंबरा घराचा सौभाग्यानें उजळला

तुझें भरलेलें घर, तुझ्यावांचून रिकाम
परी नित्य निनादलें तुझ्या सुधातुल्य नामें

आज आलीस घरांत झालें अस्मान ठेंगणें
हातीं गवसलें पुन्हा माझ्या घराण्याचें लेणें

आज आलीस घरांत, आलें घर बहरून
त्याचा स्नेहल सुगंध मनीं राहिला भरून

तुझा भरला संसार तुझ्या हातीं सोंपविला
माझ्या कांपऱ्या हातानें कसा तरी सांवरीला

आतां वर्षाव सुखाचा डोळे भरून पाहीन
गुणगौरवानें तुझ्या तृप्त होऊं देत कान

सांगली,
७-६-५९

# गौरवांजलि

[ महर्षि अण्णासाहेब कर्वे यांना त्यांच्या जन्मशताब्दी-
महोत्सवप्रसंगीं अर्पिलेली— ]

होतें जेव्हां स्मरण आपुलें
उभी राहते नयनांपुढती
दीपगृहासम धीर-गंभिरा
स्फूर्तिदायिनी अपुली मूर्ती

सिद्ध जाहलें अर्पायाला
गौरवांजली अपुल्या चरणीं
वर्षाऋतुचें दयार्द्र अंतर
वर्णुं कसें पण मी शब्दांनीं ?

बीज पेरिलें ज्याचें आपण
वृक्ष तयाचा गगना भिडला
शतशरदांच्या सफल जीवनीं
आपण त्याचा बहर पाहिला

ज्यांच्यासाठीं कणाकणांनीं
सतत झिजविली काया आपण
सबला झाल्या कितीक ललना
ज्ञानसुधेचें करुनी प्राशन

होतें जेव्हां स्मरण आपुलें
विनम्र होतें मस्तक असुचें
धरणीवरल्या तृणांकुरांनीं
मेघ-ऋणांतच रहावयाचें

असंख्य कन्या आज कार्यरत
घ्या विश्रांती शिणली काया
उदंड सुखमय आयु लाभुं दे
मंगल आशीर्वाद द्यावया

मिरज,
१५-४-५८

# मुक्या कळ्या

मुक्या कळ्या आणुनिया बाले
ठेविल्यास तूं फुलावयाला
सुजाणतेच्या गर्वानें मी
“ वेडी ! ” म्हणुनी हंसलें तुजला

तूं वेडी ? छे ! तुझ्याहूनही
कधीं कधीं मी वेडी बनतें
आशेच्या अन् आकांक्षेच्या
मुक्या कळ्या मी फुलवित बसतें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११२५७
ग्रंथ : शाखा

सांगली,
३०-६-५४

# सखये वीणे !

दूर झुगारुनि दिलीं बंधनें
तुझिया सन्निध धांवत आलें
करावयाचें रितें मला मन
किती दिसांचें तें भरलेलें

बोल मधुर तव ऐकायाला
आतुरलें मम मानस सखये
हळुवारपणें घाल व्यथेवर
मधु बोलांची फुंकर सदये !

अबोल कां पण आज अशी तूं
आला कसला किंतु अंतरीं ?
छेडाया तुज हवें मृदु करें !
खुल्या दिलानें बोल अतां तरि !

चराचरांतिल उदासीनता
अंतरांत मम भरुनि राहिली
मोदमयी तूं सखये वीणे !
म्हणुनि तुजकडे धांव घेतली

किती छेडिल्या रागरागिण्या
आर्तताच पण भिडते हृदया
थांब क्षणभरी ना तरि दाखिव
तुझी आगळी मजला दुनिया

आनंदाचा संवादी स्वर
मजजवळीं कां तुज गवसेना ?
मैफल अपुल्या मनामनाची
म्हणुनि काय गे सखि रंगेना !

मि र ज,
७-१०-५८

# माझी मैत्रीण

ठेंगणी ठुसकी सांवळया रंगाची
माझी एक मैत्रीण
राहते माझ्या घरासमोर !
तसा आमचा परिचय नाहीं.
गप्पा नाहींत, चहा नाहीं.
आमची भेट नुसती नजरेची !

तिचं घर म्हणजे नांदतं गोकुळ
पण तिच्या दृष्टीनं
सदाचं रिकामं !
सनाथ असून अनाथ
शहाणी असून वेडी
आणि कामसू असून चुकार
अशी आहे माझी मैत्रीण !

ती कुणाशीं बोलत नाहीं
तिला कशाची ओढ नाहीं
नशिबाशीं झुंजत
कामाचे गाडे ओढत
कसं तरी घालवीत आहे ती आपलं जीवन !

कधीं आपल्या भरलेल्या डोळयांनीं
सांगते ती मला
आपल्या सासुर-वासाची करुण कहाणी.

कधीं तिच्या थिजलेल्या डोळ्यांत
दिसते लकाकी दुर्दम्य आशेची !
कधीं तिच्या आर्त नजरेंत
दिसते मला
मातृत्वाची अनावर अतृप्ती !
कधीं तिच्या डोळ्यांतून
पडतात बाहेर
असूयेच्या, द्वेषाच्या दाहक ठिणग्या
आणि त्याची झळ
लागते साऱ्या घरा-दाराला !

आणि कधीं कधीं
इकडं तिकडं कोणी नाहींसं बघून
एखाद्या पोराला
घेते ती हळूच जवळ
आणि करते त्याच्यावर
दबलेल्या वात्सल्याची
अविरत बरसात !

दाराचे आडून...अनिमिष नजरेनं
बघतें मी...
तिचं क्षणभराचं तृप्त जीवन !
आणि......
आणि आमची नजरानजर होतांच
ती अशी कांहीं लाजते कीं...
ती जणुं लाजाळूचं पानच !

सांगली,
६-९-५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ८५१३७ वि: काव्य
क्रमांक १६८० नों: दि: २४।७।८०

# रिकामा शिंपला

माझिया मनाचा रिकामा शिंपला
कोपऱ्यांत एका आहे पडलेला
वर्षतो भोवतीं स्वातीचा पाऊस
लागते चाहूल रित्या शिंपल्यास
अबोध अस्पष्ट तळीं खळबळ
माजून राहते सदा सर्वकाळ
सागरावरती वर्षाव मोत्यांचा
रिकामाच परी शिंपला मनाचा !

जाते पानबुडी अधीर होऊन
सागरतळाचा शोधी कोन कोन
हलकाफुलका रिकामा शिंपला
पुन्हा पुन्हा तिच्या लागतो हाताला
निराश होऊन फेकते बाजूला
किती दिवसांचा रिकामा शिंपला !

मि र ज,
७ - ८ - ५७

# जीवनसंदेश

शिशिर-भयानें भांबावले वृक्ष
भोंवळ आली पर्णसंभाराला
वृक्षांच्या तळांत सुकल्या पानांचा
खच पडलेला दिसाया लागला

तुला वृक्षराजा, पाहून निष्पर्ण
मानस माझें उदास जाहलें
सकलांना नित्य आश्रय देणारें
ऐश्वर्य तुझें कुठें रे गेलें ?

वाटलें मजला संपली सदाची
तुझी सळसळ–जीवनसंगीत
ज्याच्या लयीसंगें नाचला, खेळला
सदैव माझिया मनाचा एकान्त

वाटलें, संपली जीवनासक्ति
तुझें त्यागमय जीवन संपलें
तुझ्या संगतीचा सोडावया नाद
कसें तरी मन तयार जाहलें

परी एके दिनीं झालें मी स्तिमित
पाहून तुझिया कायेचा पालट
कणाकणांतून तुझ्या वृक्षराजा !
हंसाया लागला वसंताचा थाट

सोनेरी, तांबूस, हिरव्या लाटा
वसंतवाऱ्याशीं लागल्या खेळाया
लाटांच्या वरती रंगीत पक्ष्यांच्या
चिमुकल्या नावा लागल्या डोलाया

पुनरपि तुझें फुललें जीवन
माझेंहि सुकलें मानस हांसलें
लाभतां प्रेरक जीवन-संदेश
गगन-भरारी माराया उठलें

मि र ज,
२३-७-५९

# कोरें पत्र

पाठवुनी पत्र रोज
गुज तुजला सांगावें
भावोत्कट मन माझें
वाटे तुज दावावें

इंद्रधनूंतिल सुंदर
रंग त्यांत भरलेले
रानफुलावरिल तरल
दहिवरांत भिजलेलें

मधवेडया माशीसम
पुष्पामधि रमणारें
लुसलुशीत गवतासह
स्वच्छंदें डुलणारें

क्षणभरांत हंसणारें
कलिकेसम फुलणारें
परि मधुनच नाजुकशा
सुमनासम सुकणारें

शब्दांच्या जाळयामधि
पकडाया बघतें मन
काय करूं ? लागेना
हाताला चपळ मीन

म्हणुनि आज पाठवितें
पत्र तुला हें कोरें
कळतिल ना शब्दांविण
भाव मनांतिल सारे

मिरज,
१२ - १० - ५७

# लज्जित वनयुवती

नेसुनिया साडी हिरवी सोनसळी
जरतारी पिवळी अंगामाधिं चोळी
वागर मेघाची सजल गडद काळी
घेऊनि डोइवरी वनयुवती भोळी
परत घरीं जावें म्हणुनि जलद चाले
घट डोईवरचा तालावर हाले

तोंच खडा कुठुनी घढावरी पडला
खट्याळ सजणानें दुरुनी फेकियला
फुटला घट, आल्या जलधारा खालीं
लज्जित वनयुवती अंगांगीं भिजली
लटक्या रागानें पाहे भंवतालीं
मिचकावुनी डोळे सखा हंसे गालीं

मि र ज,
२४ - ७ - ५९

# लाभ

सकाळींच भारद्वाज
आला माझ्या अंगणांत
म्हणे शेजी, "आज तुला
लाभ होणार खचित !"

अवाचित काय माझ्या
आज येणार हातांत?
काय नवें दिसणार
साध्यासुध्या जीवनांत !

जिवाभावाचा पाहुणा
येईल का आज घरीं ?
स्नेहकुसुमाचा गंध
दरवळेल संसारीं !

काव्य-शास्त्र-विनोदाचा
घरां बहर येईल
माझ्या निर्भेळ सुखाचा
सख्या हेवा करतील !

भावोत्कट पत्र आज
काय पाठवील कोणी ?
वाऱ्यावरी तरंगावा
दिस त्याचा पारायणीं !

ओळ नवीन काव्याची
खेळेल का ओठावर ?
तिच्या धुंद संगतींत
माझा मलाच विसर !

लाभासाठीं आज माझें
मन उतावीळ झालें
घरीं, दारीं, अंगणांत
घुटमळतीं पाउलें !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...२७९३५... वि: ...आ०५...
क्रमांक ...९८७०... नों: दि: २४।८।६०

मि र ज,
१३-८-५८

# मौनांतच

मौनाच्या जाळ्यानें मज पुरतें वेढियलें
जरि जाळें मृदुल तरल घुसमटुनी मी गेलें
सारावें दूर जाल, निसटावें त्यामधून
धडपडलें, परि गेलें अधिकच मी गुरफटून

अवाचित त्या गूढतरल पटलांतुन मज दिसला
वेगळाच आसमंत वेगळीच मी मजला
मौनांतच दिसला मज हृदयाचा कोन कोन
प्रतिबिंबित झालेल्या जगताचें हो दर्शन

मौनांतच केल्या मीं गुजगोष्टी मजसंगें
जोडियले बंध नवे मौनाच्या सत्संगें
मौनांतच आढळला सृजनाचा बीजांकुर
मौनांतच जाणवलें जें उदात्त चिरसुंदर

मौनांतच मी माझी अन् अवघ्या जगताची
मौनांतच उलगडतिल कोडीं मज विश्वाचीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. मुख्य शाखा.
अनुक्रम २८७३५ वि. ८१०२५
क्रमांक १८४७० नों: दि: २९।९।६०

मि र ज,
१ - ८ - ५०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ११२५७
ग्रं. शाखा

REFBK-0011257
REFBK-0011257